# विदर्भ इंडस्ट्रीज पॉवर लिमिटेड

एच ब्लॉक, १ला मजला, धिरुभाई अंबानी नॉलेज सिटी, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१०

वेबसाईट : www.reliancepower.co.in

## जाहीर सूचना

**विदर्भ इंडस्ट्रीज पॉवर लिमिटेडच्या पारेषण व्यवसायासाठी आव २०१४-१५ आणि आव २०१५-१६ साठी भांडवली खर्चास मान्यता देण्यास आणि एकंदर महसुली आवश्यकता निश्चित करण्यासाठीच्या याचिकेवर सूचना/ हरकती (प्रकरण क्र ३६ सन २०१५)**

१. विदर्भ इंडस्ट्रीज पॉवर लिमिटेडने (व्हीआयपीएल) १८ फेब्रुवारी २०१५ रोजी आपल्या - ट्रान्समिशन बिझनेसकरिता (पारेषण व्यवसाय) आर्थिक वर्ष (आव) २०१४-१५ आणि आव २०१५-१६ मधील भांडवली खर्चास आणि वार्षिक महसुली आवश्यकता (एआरआर) च्या निश्चितीस मान्यता मिळविण्यासाठी महाराष्ट्र राज्य वीज नियामक आयोगापुढे एमईआरसी (बहु वर्ष प्रशुल्क) नियमावली २०११ च्या तरतुदींनुसार आणि आयोगाने प्रकरण क्र.६० सन २०१४ अंतर्गत दि. ५ जानेवारी २०१५ रोजी दिलेल्या पारेषण परवाना आदेशातील निर्देशाचे अनुपालन करण्यासाठी एक याचिका दाखल केली आहे. आयोगाने ही याचिका जानेवारी २८ सप्टेंबर २०१५ रोजी दाखल करून घेतली आहे आणि वीज अधिनियम, २००३ च्या कलम ६४(२) खाली सूचना / हरकती मागविण्यासाठी एक जाहीर सूचना प्रकाशित करण्याचे निर्देश व्हीआयपीएलला दिले आहेत.

२. याचिकेची ठळक वैशिष्ट्ये खाली दिलेली आहेत :

**तक्ता १ : व्हीआयपीएलच्या पारेषण व्यवसायाचा भांडवली खर्च** (रु. कोटींमध्ये)

| अनु क्र. | विवरण | मूळ अंदाज* (ए) | प्रत्यक्ष खर्च (ब) |
|---|---|---|---|
| **१** | **प्राथमिक आणि परिचालन-पूर्व खर्च** | १.४५ | १.४५ |
| **२** | **प्रकल्पाचा ईपीसी खर्च** | | |
| २.१ | पुरवठा आणि उभारणी (सेवा) खर्च | १४.०० | १७.३९ |
| **३** | **नॉन-ईपीसी खर्च** | | |
| ३.१ | जमीन भरपाईपोटी खर्च | १.३० | १.३० |
| **४** | **बांधकाम काळादरम्यान व्याज आणि अर्थपुरवठ्याचा खर्च** | १.९२ | २.७५ |
| **५** | **एमएसईटीसीएल पर्यवेक्षणाचा खर्च** | - | ५.७५ |
| **६** | **एकूण** | **१८.६७** | **२८.६४** |

*भांडवली खर्चाचा मूळ अंदाज व्हीआयपीएलद्वारा

**तक्ता २ : व्हीआयपीएलच्या पारेषण व्यवसायाचे भांडवलीकरण** (रु. कोटींमध्ये)

| आव २०१२-१३ प्रत्यक्ष | आव २०१३-१४ प्रत्यक्ष | आव २०१४-१५ | आव २०१५-१६ | एकूण |
|---|---|---|---|---|
| ७.२७ | २१.३७ | - | - | २८.६४ |

**तक्ता ३ : आव २०१४-१५ आणि २०१५-१६ (रु. कोटींमध्ये)** (रु. कोटींमध्ये)

| अनु क्र. | विवरण | आव २०१४-१५ | आव २०१५-१६ |
|---|---|---|---|
| १ | परिचालन आणि देखभाल खर्च | ०.६६ | ०.६९ |
| २ | घसारा खर्च | १.४९ | १.४९ |
| ३ | दीर्घ मुदतीच्या भांडवल कर्जावरील व्याज | २.५६ | २.१० |
| ४ | खेळत्या भांडवलावरील आणि ग्राहकांच्या सुरक्षा अनामत ठेवींवरील व्याज | ०.१३ | ०.१३ |
| ५ | इतर खर्च | - | - |
| ६ | आयकर | ०.३४ | ०.३४ |
| ७ | आपत्कालीन राखीव निधीसाठी योगदान | ०.१४ | ०.१४ |
| **८** | **एकूण महसुली खर्च** | ५.३२ | ४.८९ |
| ९ | समभाग भांडवलावरील परतावा | १.२७ | १.२७ |
| **१०** | **एकंदर महसुली आवश्यकता** | ६.५९ | ६.१६ |
| ११ | वजा : गैर-प्रशुल्क उत्पन्न | ०.०१ | ०.०२ |
| १२ | वजा : इतर व्यवसायांमधील उत्पन्न | - | - |
| **१३** | **पारेषण प्रशुल्काकडून एकंदर महसुली आवश्यकता** | **६.५८** | **६.१४** |

३. पुढील कागदपत्रांच्या प्रती लेखी विनंतीवरून विदर्भ इंडस्ट्रीज पॉवर लिमिटेड (व्हीआयपीएल) ह्यांच्या खाली नमूद केलेल्या कार्यालयांमधून मिळू शकतील :

अ. प्रस्तावांचे कार्यकारी सारांश (विनामूल्य, मराठी किंवा इंग्लिशमध्ये)

ब. तपशीलवार याचिका कागदपत्रे सीडी सह (इंग्लिशमध्ये) (रु.१५०/- रोख किंवा ''विदर्भ इंडस्ट्रीज पॉवर लिमिटेड'' ह्यांच्या नावे मुंबई येथे देय असलेल्या डीडी/चेकद्वारा भरल्यावर)

क. तपशीलवार याचिका कागदपत्रे (इंग्लिशमध्ये) (रु.१००/- भरल्यावर)

ड. तपशीलवार याचिका कागदपत्रांची सीडी (इंग्लिशमध्ये) (रु.५०/- भरल्यावर)

**ऑफिस :**

| ऑफिस | पत्ता | फोन / फॅक्स नं. | ई-मेल |
|---|---|---|---|
| ऑफिस | विदर्भ इंडस्ट्रीज पॉवर लिमिटेड,<br>धिरुभाई अंबानी नॉलेज सिटी, जी ब्लॉक, २रा मजला,<br>ठाणे बेलापुर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४००७१० | फोन : +९१-२२-३०३८५६०४<br>फॅक्स : +९१-२२-३०३८५८५१ | manoj.pongde@relianceada.com |
| रजिस्टर्ड ऑफिस | विदर्भ इंडस्ट्रीज पॉवर लिमिटेड,<br>एच ब्लॉक, १ला मजला, धिरुभाई अंबानी नॉलेज सिटी,<br>ठाणे बेलापुर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४००७१० | फोन : +९१-२२-३०३८६६००<br>फॅक्स : +९१-२२-३०३८६९९९ /३०३८६७९९ | |
| नागपुर साईट ऑफिस | विदर्भ इंडस्ट्रीज पॉवर लिमिटेड,<br>रिलायन्स पॉवर लिमिटेड, डी-३,<br>एमआयडीसी इंडस्ट्रियल एरिया, बुटीबोरी, नागपुर-४४११२२ | फोन : +९१-७१०४-३०५६०१<br>फॅक्स : +९१-७१०४-३०५७२० | |

४. आयोगाने व्हीआयपीएलला तिच्या याचिकेवर ह्या सूचनेद्वारे सूचना/ हरकती मागविण्याचे निर्देश दिले आहेत. त्या सचिव, महाराष्ट्र राज्य वीज नियामक आयोग, १३ वा मजला, सेंटर क्र.१, वर्ल्ड ट्रेड सेंटर, कफ परेड, मुंबई-४०० ००५ ह्यांना व्यक्तिशः किंवा टपालाद्वारे (१+५ प्रती) किंवा फॅक्सने (क्र.(०२२) २२१६३९७६) किंवा ई-मेलने : (mercindia@mercindia.org.in) वर **२३ ऑक्टोबर २०१५** पर्यंत सादर करावयात व त्यासह बिझनेस हेड, विदर्भ इंडस्ट्रीज पॉवर लिमिटेड, एच-ब्लॉक, १ला मजला, धीरुभाई अंबानी नॉलेज सिटी, नवी मुंबई - ४०० ७१० ह्यांना त्या दिल्या असल्याचा पुरावा सादर करावा.

५. सूचना/ हरकती इंग्लिशमध्ये किंवा मराठीमध्ये असाव्यात आणि प्रेषकाचे संपूर्ण नाव, टपालाचा पत्ता आणि असल्यास ई-मेल पत्ता त्यावर नमूद केलेला असावा. सूचना/हरकती एखाद्या संस्थेच्या वतीने किंवा ग्राहकांच्या एखाद्या संवर्गाच्या वतीने दाखल करण्यात येत असल्यास तसे निर्देशित करणे आवश्यक आहे. प्रेषकाला आपले म्हणणे व्यक्तिशः मांडावयाचे असल्यास त्याला तशी संधी **दिनांक २६ ऑक्टोबर २०१५ रोजी सकाळी ११:३० वाजता महाराष्ट्र राज्य वीज नियामक आयोग कार्यालय, १३ वा मजला, सेंटर क्र.१, वर्ल्ड ट्रेड सेंटर, कफ परेड, मुंबई-४०० ००५** येथे आयोजित जाहीर सुनावणीच्या वेळी दिली जाईल, ज्यासाठी कोणतीही स्वतंत्र सूचना दिली जाणार नाही.

६. व्हीआयपीएल, वेळेत प्राप्त झालेल्या प्रत्येक सूचनेला आणि हरकतीला ती प्राप्त झाल्यापासून तीन दिवसांच्या आत पण **२६ ऑक्टोबर २०१५** पर्यंत पण त्यानंतर प्राप्त झालेल्या सर्व भाष्याला/सूचनांना उत्तर देईल. व्हीआयपीएलने दिलेल्या उत्तरांवर हितसबंधी लोक त्यांचा प्रतिसाद जाहीर सुनावणीच्या वेळी किंवा उशिरात उशीरा २९ ऑक्टोबर २०१५ पर्यंत सादर करू शकतात.

७. तपशीलवार याचिका कागदपत्रे आणि सारांश www.reliancepower.co.in ह्या व्हीआयपीएलच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. कार्यकारी सारांश आयोगाच्या www.mercindia.org.in / www.merc.gov.in ह्या संकेतस्थळावरही डाऊनलोड करता येण्यासारख्या स्वरूपात (विनामूल्य) उपलब्ध आहे.

स्थळ : नवी मुंबई
दिनांक : ३० सप्टेंबर, २०१५

सही/-
नाव : विभव अगरवाल
पदनाम : वरिष्ठ उपाध्यक्ष
विदर्भ इंडस्ट्रीज पॉवर लिमिटेड